: प्रकरण दुसरे :

"शिळान आधिक आठ कथा" या कथासंग्रहाची स्वरूप व वैशिष्टये

## : प्रकरण २ रे :

## "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील कथेची स्वरूप वैशिष्टये

**प्रास्ताविक :-**

मागील प्रकरणात आपण "मराठी ग्रामीण कथेची वाटचाल" अभ्यासली. त्याचबरोबर उद्धव ज.शेळके यांच्या कथावाङ्.मयाचे स्वरूप जाणून घेतले. लेखक म्हणून ते कसे घडले, तसेच त्यांची वाङ्.मयीन जडणघडण लक्षात घेतली आहे. प्रस्तुत प्रकरणात "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील कथेची स्वरूप वैशिष्टये यांचा अभ्यास आपणास करावयाचा आहे.

"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील प्रत्येक कथेचा आशय, समाजचित्रण, व्यक्तिचित्रण, भाषाशैली इत्यादी अंगाने आपणास अभ्यास करावयाचा आहे. १९६० नंतरच्या कथाकारात उद्धव ज.शेळके हे एक महत्वाचे लेखक ठरले आहेत. लहानपणापासूनच जिद्दी व महत्वाकांक्षी स्वभाव असल्याने अत्यंत सामान्य व प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या आयुष्यातला बहुतेक काळ अमरावतीला गेला असला तरी पुण्यात काही काळ त्यांचे वास्तव्य होते. उद्धव ज.शेळके यांनी आपल्या आयुष्यात कसल्याही प्रकारची नोकरी अथवा व्यवसाय केला नाही. केवळ लेखन हाच त्यांच्या उपजिविकेचे साधन मानुन जीवन व्यतीत करणाऱ्या साहित्यिकांची संख्या अगदीच अल्प आहे. अशा फार थोडया साहित्यिकांपैकी उद्धव ज.शेळके हे एक उत्तम उदाहरण लेखकामध्ये देता येईल. उद्धव ज.शेळके यांनी आपल्या लेखनातून ग्रामीण जीवनच केंद्रस्थानी मानले आहे. "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहात ते वैदर्भीय जीवनातील ग्रामीणतेचा उभा आडवा छेद घेताना दिसतात.

सर्वप्रथम त्यांच्या कथा लेखनास प्रेरणा कशी मिळाली हे पाहणे आवश्यक ठरते.

**साहित्याची प्रेरणा :-**

आत्मशोध व जीवनशोध या साहित्याच्या दोन प्रेरणा आहेत. कादंबरी या वाङ्.मय प्रकारात आत्मशोधाची प्रेरणा अद्भूतरम्यता, स्वप्नरंजन, निर्भरशीलता, वास्तवशीलता या मार्गाने अधिक प्रकटलेली दिसते. याउलट जीवनशोधाची प्रेरणा वास्तवाशी अधिक निगडित झालेली आढळते. मात्र हा प्रवास सर्वांनाच करता येईल असे नाही. त्यासाठी जाणीवनिष्ठा ही पहिली अट असते. मराठी कादंबरीच्या क्षेत्रात चिं.त्र्यं.खानोलकर उर्फ आरती प्रभू भालचंद्र नेमाडे यांच्यासारख्या अपवादात्मक व्यक्तींच्या या संदर्भात आवर्जून उल्लेख करावा लागतो. याच मालिकेतील आणखी एक महत्वपूर्ण नाव कथाकार व कादंबरीकार म्हणून उद्धव ज.शेळके यांच्या नावाचा उल्लेख आवर्जून करावा लागतो.

**उद्धव ज.शेळके यांची साहित्यसंपदा :-**

मराठी साहित्य क्षेत्रात विशेषतः कथा व कादंबरी विश्वात विपूल लेखन करणारे उद्धव ज.शेळके परिचित आहेत. त्यानी कथा वाङ्.मयात जवळ जवळ दहा कथासंग्रह लिहून मोलाची भर घातली आहे. तसेच कादंबरी विश्वात एकूण सत्तावीस कादंबऱ्या लिहिल्या. उद्धव ज.शेळके यानी आपल्या कथालेखनाचा प्रारंभ "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहाने केला. पहिल्याच कथासंग्रहाने त्याना भरपूर यश मिळवून दिले. प्रकाशकाला पैसे देवून पुस्तक प्रकाशित करून घेण्यापेक्षा स्वतःच तो प्रकाशित करणे हे त्यांना अधिक सोयीचे वाटले. "शिळान अधिक आठ कथा" या त्यांच्या कथासंग्रहाला राज्यसरकारचे पारितोषिक मिळाले. १९५९ साली त्यांची पहिली आवृत्ती संपली. त्यामुळे त्यांची उमेद वाढली. लेखकाबरोबर ते प्रकाशकही होऊ लागले. कलात्मक कथेचा आशय व्यक्त करण्याचे कौशल्य यामुळे मराठी मनावर छाप पडली परंतु कथाविश्वात त्यांचे मन अधिक गुंतले नाही. कारण नंतरच्या त्यांच्या कथासंग्रहास म्हणावे तसे यश लाभले नाही. तरीही त्यांनी एकूण नऊ कथासंग्रह प्रसिद्ध केले ते पुढील प्रमाणे, "शिळान अधिक आठ कथा", "वानगी", "संसर्ग", "गरिबा घरची लेक", "घुसळण", "कडूनिंबाची सावली", "बाबला", "बिंदीया", "उमरखा कुलकर्णी"

याशिवाय आणखी एक कथासंग्रह प्रसिद्ध झाला तो म्हणजे "उमलली कळी" अशा या विश्वात त्यानी कथासंग्रहाची दशकपूर्ती करून ते थांबले. त्यानंतर त्यानी आपले संपूर्ण लक्ष कादंबरी क्षेत्रात केंद्रित केले.

उद्धव जयकृष्ण शेळके यांच्या तीन कथासंग्रहाचा अभ्यास मी या प्रबंधिकेत करणार असून ते तीन कथासंग्रह पुढीलप्रमाणे "शिळान अधिक आठ कथा", "वानगी" आणि "कडूनिंबाची सावली" या कथासंग्रहाचा अभ्यास या प्रबंधिकेत मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. वरील तीन कथासंग्रहाचा अभ्यास एकूण सहा प्रकरणामध्ये मांडावयाचा आहे. पहिले प्रकरण 'मराठी ग्रामीण कथेची वाटचाल', दुसरे प्रकरण 'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहातील कथेची स्वरूप व वैशिष्टये. तिसरे प्रकरण 'वानगी' या कथासंग्रहातील कथेची स्वरूप व वैशिष्टये, चौथे प्रकरण 'कडूनिंबाची सावली' या कथासंग्रहातील कथेची स्वरूप व वैशिष्टये, पाचवे प्रकरण मराठी कथा साहित्यात उद्धव ज.शेळके यांचे योगदान व शेवटच्या सहाव्या प्रकरणात समारोप करणार आहोत. अशा रितीने माझ्या प्रबंधिकेची मांडणी आहे.

"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील प्रत्येक कथेचा आशय पाहणे आवश्यक ठरते. प्रथम या कथासंग्रहातील कथांचे स्थूल स्वरूप आपण पाहू.

सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर उद्धव ज.शेळके प्रकाश टाकतात. त्यांचे दुःख, व्यथा, वेदना, कष्ट, सोशिकपणा, कथेत मांडलेला दिसतो. कलावंताची तटस्थ भूमिका घेऊनच शेळके जीवन चित्रित करताना दिसतात.

**दारिद्रयामुळे होणारा भावनिक कोंडमारा :-**

"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील काही कथेतून दारिद्रयामुळे होणारा भावनिक कोंडमारा दिसून येतो. प्रामुख्याने "लेकुरवाळी", "पावसाळा", "माय" या कथा दिसून येतात.

✓ **लेकुरवाळी :-**

दारिद्रय हे माणसाच्या जणू पाचवीलाच पुजले आहे. या जगात पाऊल ठेवलं न ठेवलं एवढयात जणू दारिद्रयाने त्याच्यावर झडप घातलेली आहे आणि म्हणूनच दारिद्रयाशी झगडत राहणं त्याना अपरिहार्य होऊन बसलेले आहे. भूक भागविणे हेच त्यांच्या कथेतल्या व्यक्तीचे जीवन बनलेले आहे आणि म्हणूनच भूक भागविणसाठी त्यांची सतत धडपड चाललेली असते. कमाईचा आणि जगण्याचा ही माणसे येथे हिशोब मांडतात. त्याचा मेळ घालण्याचा ते प्रयत्न करतात. पण हा मेळ सहसा लागलेला दिसत नाही. तरीही हा मेळ घालण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो. त्यासाठी अनेक सोप्या दिसणा-या उपायांचा ते अवलंब करतात. भूक लागू नये एवढीच जगण्याचा संदर्भातील त्यांची इच्छा असते म्हणूनच ती पोट रितं असल्यास तांब्या दोन तांबे पाणी पितात. रितं पोट भरून काढतात. कधी कधी लांडीलबाडी, चोरी देखील करतात पण आपण करीत आहोत, ती चोरी आहे, चोरी करणे पाप आहे असे त्यांना वाटत असल्याचे कधी दिसत नाही. म्हणून इंधन कमी पडल्यास तो दुस-याच्या घरापुढचा पांजो-याचा खोका, कधी हुडातल्या चार गोव-या किंवा तु-हाटया सावडून आणतात. यातले काहीच मिळण्याचा संभव दिसला नाही तर ही माणसे आढयाच्या वासा तोडू लागतात आणि तो तोडल्याचा आवाज मालकाच्या कानी जाऊ नये म्हणून भूकेने अगोदरच रडकूंडीला आलेल्या लेकराच्या पाठीत जोराचा रट्टा मारतात. एवढया जोरात मारतात की ते मूल ताबडतोब भोकाड पसरते आणि भोकाड पसरताच वासा मोडतो पण आवाज फारसा होत नाही.

दारिद्रयाशी त्यांचा चालू असलेला झगडा अधिक तीव्र स्वरूपाचा व्हावा म्हणूनच की काय शेळक्यांच्या कथेतल्या या माणसाना चिल्ली पिल्ली आहेत आणि गमतीची गोष्ट अशी की या माणसाना त्याबद्दल कधी खंत वाटताना दिसत नाही. भरपूर संतती आपल्या बाबतीत शाप आहे असे कधी वाटत असल्याचे दिसत नाही. उलट दोन जीवाच्या बाईला जपण्याचा त्यांचा प्रयत्न असतो पण तो जीव त्या बाईपासून वेगळा झाल्यानंतर असा काही प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे असे त्याना कधीच वाटत नाही. दुधाबरोबर दारिद्रयाशी

झगडण्याचे बाळकडू त्याना दिले जाते आणि एवढयाशा वयात देखील जगण्याचा अर्थ त्याना कळू लागतो. जगण्याच्या अर्थ आपल्या बाबतीत जिवंत राहण्यापूरताच मर्यादित आहे हे त्याना जाणवते. कोरभर भाकर खाऊन वर तांब्याभर पाणी पोट ख्रिवण्यास किंवा सकाळी लवकर जेवण न करता बारा वाजता जेवण केल्यास भूक लवकर लागत नाहीं. हे त्याना शिकवले जाते आणि मग अनुभवानीही कळू लागते.

पोट भरण्याच्या त्यांच्या या धडपडीतूनच त्यांचे बरेचसे दुःख जन्माला आलेले आहे. पण केवळ दारिद्रियापोटीच हे दुःख निर्माण झालेले आहे असे नाही. त्याला इतरही काही कारणे आहेत. आणि ती कारणे देखील तेवढीच महत्वाची आहेत "लेकुरवाळी" या कथेत शेवंताला बाळांतरोग झालेला आहे. या बाळांतरोगात आपल्याला काही तरी बरे वाईट होणार आहे. आपण निश्चित या जगातून जाणार आहोत हे तिला कळून चुकलेले आहे पण म्हणून तिला दुःख वाटत नाही. आपण मरणार याचे तिला वाईट वाटत नाही तर आपल्या माघारी चिल्ल्या पिल्यांचे कसे होणार हीच तिला काळजी लागलेली आहे आणि त्या काळजीच्या पोटीच तिचे दुःख निर्माण झालेले आहे. असे "लेकुरवाळी" या कथेतून स्पष्ट होते.

या कथेमधील जाणिवा जशा ग्रामीण आहेत तशीच त्यांची भाषाही ग्रामीण आहे. ती खास व-हाडी बोली बोलतात. या व-हाडी बोलीतील संवादाला जुळेल अशीच भाषा निवेदनासाठी वापरतात. त्यातून त्या माणसांची ग्रामीणताही व्यक्त होते ते वर्णन करताना लेखक म्हणतो, "मांडयापर्यंत धोतर खोचलेला, पोट-यापर्यंत पाय भिजलेला, खांद्यावर दोराची चुंभळ असलेला एका हातात बादली व दुस-या हातात उताण्या तळव्यावर हंडा पेलणारा भगवंता खालच्या मानेने आपल्या दाढयाकडे चालला होता" हे वर्णन निश्चितच ग्रामीण व्यक्तिमत्व उभे करणारे आहे. "लेकुरवाळी" ही कथाही खेडयातून पोट भरण्यासाठी म्हणून शहरात आलेल्या न्हाव्याच्या बायकोची शेवंताची करूणमय कथा आहे.

"माय" :-

ही कथा उद्धव ज.शेळके यांनी अतिशय घरगुती किंवा साध्या भाषेत लिहिली आहे. एक गरीब झुंजणारी फाटक्या कपडयातील "माय" उभी झाली. उद्धव ज.शेळक्यानी "माय" या कथेमध्ये केलेल्या लेखनाप्रमाणे जग पाहिले आहे आणि भोगलेही आहे. याचा पुरावा त्यातील वाक्यावाक्यातून येतो.

उद्धव ज.शेळके यांच्या कथेतील व्यक्ती प्रामुख्याने गरीबीशी नियतीशी झुंज घेत असलेल्या दिसतात. अशी गरीबीशी नियतीशी झुंज चालू असताना ती कावलेली त्रासलेली उबगलेली वाटते तरीही अंतर्यामी ती परस्पर विषयी माया बाळगून असलेली दिसतात. "माय" या कथेतील माय काम न करता बसून खाणाऱ्या "बा" शी सरळ बोलत नाही. पण स्वतः जीवापाड श्रम करून पोराबाळासह ती 'बा' लाही सांभाळते कामावर जाताना एका भाकरीचे चार तुकडे ठेवते. तीन तुकडे मुलांना आणि चवथा 'बा'साठी असतो. घरासाठी खस्ता खाणारी ही 'माय' कथा वाचून झाल्यावरही वाचकाच्या डोळयापुढे तरंगत राहते. एवढी ती मनावर ठसते. "माय" या कथेमध्ये आई आपल्या अर्धपोटी तर कधी उपाशी राहणाऱ्या मुलांना म्हणते, 'काही मागून खायचं नाही. कोन देल्ल तर खाऊ नका, घर सोडायचं नाही. मी आल्यावर कोणतीबी बोंब झाली तर एकेकाच्या पाठीचं सालटं लोंबवीन" सदवर्तनाच्या गोष्टी साधारणतः पोट भरल्यानंतर सूचत असतात परंतु येथे मात्र उपाशी असल्यानंतर ही प्रामाणिकपणाची सदवर्तनाची पालकाना अपेक्षा आहे. येथे एवढया गरीबीतही शेजार धर्माचे पालन करण्याची वृती दिसून येते.

उद्धव ज.शेळके यांची "माय" ही कथा म्हणजे मायचे उत्कृष्ठ शब्दचित्र आहे. त्यामध्ये मायचा करारीपणा, सोशिकता दिसून येते. स्वतः शेळके किंवा त्यांचे मित्र मधुकर केचे म्हणतात, 'माय कथेला वाढवून 'धग' ही कादंबरी लिहिली आहे. "माय" कथा आणि 'धग' कादंबरी यांची तुलना केल्यानंतर उद्धव ज.शेळक्यानी मूळ कथेचा विस्तार केला आहे हे लक्षात येते.

✓ **"पावसाळा" :-**

या कथेत शिंप्यांचे काम करणारा तात्या आणि त्याची सोशिक समजूतदार बायको आहे. स्वतःची मशीन असणाऱ्या शिंप्याकडे हिस्सेवारीने काम करणाऱ्या तात्यांची कमाई ती किती असणार? त्यात तो स्वतः त्याची बायको आणि दोन मुले यांचा गाडा चालवायचा. पावसाळयात शिंप्याकडची कामे कमी होतात. मालकालाच जिथे काम कमी तिथे कारागिराला किती मिळणार? उपास तापास करीत कसाबसा गाडा हाकायचा. हा तात्या दुकानात रिकामा बसला तरी मशीनवर काम करणाऱ्या मालकाच्या गप्पा रस घेऊन ऐकतो. मधून मधून त्याला प्रोत्साहित करण्यासाठी योग्य असा प्रतिसादही देतो. गरज पडली तर त्याला पैसे मागतो. कामाचे पैसे मिळाले की मीठ, मिरची, तांदूळ, ज्वारी, बेसन, दाळ, इंधन इ. पैसा,पैसा मोजून दोघे नवरा बायको हिशोब लावतात व सामान आणतात. त्यातला एखादा आणा तो बिडीसाठी बायकोला खर्चायला सांगतो किंवा सकाळच्या चहासाठी आणा दोन आणे राखून ठेवायला सांगतो.

दुकानावर तात्याचा मुलगा आला तर मालकाकडून दोन आणे घेऊन मुलाला देतो. दुकानातून उठून रस्त्यावर बाजूल घेऊन बायको जेवली की नाही याची चौकशी करतो. जेवली नसणारच हे समजून त्या दोन आण्याचे तिच्यासाठी फुटाणे, मुरमुरे घेऊन जायला सांगतो. तसेच ती जेवली नाही म्हणून तिला एकटीलाच खाऊ द्या असे बजावतो. त्याचे त्याच्या मुलावर, सोशिक बायकोवर कसे प्रेम आहे. हे शेळके छोटया छोटया संवादातून आणि प्रसंगातून व्यक्त करतात आणि एक गरीब दारिद्रयातही समाधान मानणारा, उद्याची काळजी न करणारा कर्ता पुरूष वाचकाच्या डोळयापुढे उभा राहतो.

"पावसाळा" या कथेतील तात्याची बायकोही अशीच गरिबीची जाण असणारी, नवऱ्याची कुवत आणि परिस्थिती समजून घेणारी, त्याला साथ देणारी, सोशिक, तरीही समाधानी, स्वाभिमानी स्त्री आहे. या दोन्होही व्यक्तीचे स्वभावविशेष हे की दारिद्रयातल्या रखरखीला

तोंड देताना ते कुठे ही उद्वेग, संताप व्यक्त करीत नाहीत. जणू जे वाटयाला आले आहे ते दोघानीच नव्हे तर मुलांनीही सोसायचे, भोगायचे. एवढे असूनही उद्धव ज.शेळके यांनी या व्यक्तिचित्रणास भडकपणा येऊ दिलेला नाही. एक प्रकारची सहजता त्यात आहे. ही सहजता दैनंदिन जीवनातल्या छोटया व नित्याच्या प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसते.

**स्त्रीची होणारी कुचंबणा :-**

आपल्याकडील पुरूषसत्ताक कुटुंबपद्धतीमुळे स्त्रियांची कुचंबणा होत आली आहे. स्त्री ही कमी दर्जाची आहे. या परंपरेने लादलेल्या, कधी तिच्या अंगच्या नैसर्गिक दृष्टयाच असलेल्या दुर्बलतेमुळे तिचे शोषण सतत अनेकांगानी होत आलेले आहे. कधी आपणच निर्माण केलेली समाजव्यवस्था तिच्या दुःखाला कारणीभूत होते. तर परिस्थितीच तिची अशी कोंडी करते की तिला शरण येणे भाग पडते. स्त्री कष्ट करते, त्याग करते, कुटुंबाच्या प्रतिष्ठेसाठी सर्व काही सोसते पण आपल्या कष्टाची, त्यागाची वाच्यताही करत नाही. ग्रामीण कुटुंबातील स्त्रीची दुःखे अनेक पदरी आहेत. कुटुंबात ती जबाबदारीने अनेक नात्याचे भावबंध जपत वावरत असते. कधी आई, कधी आजी, कधी सून, कधी बायको, कधी नणंद तर कधी भावजय, जाव अशा कौटुंबिक नात्यांनी तर कधी मजुरी करणारी, सालाने दुसऱ्याच्या शेतावर राबणारी, कधी कर्त्यापुरूषामागे प्रपंचाचा गाडा नेटाने चालविणारी अशी ही स्त्री आहे. ग्रामीण कुटुंबातील स्त्रीच्या व्यथा उद्धव ज.शेळके यांनी आपल्या कथातून सहजपणाने टिपल्या आहेत.

प्रामुख्याने स्त्रीच्या व्यथा सांगणाऱ्या कथांचा विचार आपणास करावयाचा आहे. "वैरीण", "तातातूट", "घालमेल", "भाइरचं", "कढ" इ.कथा या अंगाने अभ्यसनीय आहेत.

**"वैरीण"**

या कथेतील नवऱ्याच्या आजारपणाला कंटाळलेली गीता, जेव्हा दोन दिवसापासून

आजारी असलेल्या नव-यासाठी गंगा कामावर आली नाही तेंव्हा अंतर्मूख होते. तिच्या मनातले कल्लोळ शेळके चित्रित करतात. "गंगाचा नवरा नुसता दोन दिवसापासून आजारी आहे तोही नुसता तापाने तर ती घरी आहे आपला नवरा सहा महिन्यापासून सतत आजाराशी झुंजत असून आपण कामावर आलो. येताना त्यानं आपल्याला थांबण्याचा आग्रह केला आपण तुसडेपणानं बोललो, माणूसकी सोडून वागलो एवढच नाहीं तर रात्री त्याला आपण आपल्याला वाटेल ते बोललो. उद्या काही झाल तर आपल्याला हे जन्मभर खटकत राहिल" या गीताच्या मनातील विचारातून आपल्या आजारी नव-याला जपण्याची, त्याची काळजी करणारी स्त्री "वैरीण" या कथेत उभी राहते.

**"तातातूट" :-**

या कथेत पारबतीचं दुःख थोडया वेगळया जातीचे आहे. तिच्या नव-याने तिला टाकून दिले आहे. दुसरा संसार त्याने उभा केला आहे पण या गोष्टीचे तिला दुःख नाही. नव-याने टाकून दिल्यानंतर किंवा दुसरा संसार जोडल्याबद्दल तिला दुःख वाटत नाही तर तिच्या नव-याने तिच्या पोराची व तिची "तातातूट" केली आहे. आपले असूनही ती आपले म्हणू शकत नाही. त्याला जवळ घेऊ शकत नाही. मायेने कुरूवाळू शकत नाही हेच तिचे दुःख आहे. तिच्या प्रत्येक हालचालीतून तिच्या कृतीतून तिचे हे दुःख ठिबकत राहते.

**"घालमेल" :-**

या कथेतील दुःख अधिक अबोध आहे. ते व्यक्त केले जात नाही. ते आपोआप व्यक्त होते. सांगितले जात नाही ते समजते. फारकत पत्रावर शेवंता अंगठा करीत नाही अंगठा लवकर करण्याविषयी तिला आग्रह होत आहे. तिच्यावर दबाव आणला जात आहे. आणि फारकत पत्रावर अंगठा लावताना तिच्या मनात घालमेल चाललेली आहे. आपले भवितव्य जणू तिला जाणवले आहे. जे घडत आहे ते आपल्या हिताचे आहे किंवा नाही याविषयी ती साशंक आहे आणि म्हणूनच तिच्या मनात घालमेल चालली आहे. तिच्या मनातली ही घालमेल शब्दानी व्यक्त होत नसली तरी तिच्या हालचालीतून, अंगठयाने जमीन

उकरण्यातून किंवा लुगडयाचा पदर बोटाभोवती गुंडाळण्यातून उकलण्यातून व्यक्त झाली आहे.

**"भाईस्वं" :-**

उद्धव ज.शेळके यांच्या 'भाईस्वं' या कथेत भूतबाधेबद्दलचा एक प्रसंग चित्रित केला आहे. भूतबाधेबद्दलचे लोकसमज कमी अधिक प्रमाणात सगळीकडेच आढळून येतात. शेळक्यांच्या कथेतूनही त्यांचा उल्लेख येतो. ही भूतबाधा विशेष करून तरूण स्त्रियांना मोठया प्रमाणात होते. असा समज आहे. यालाच भाईस्वं असे म्हणतात.

उद्धव ज. शेळके यांच्या "भाईस्वं" या कथेत वामनची बायको शेवंती तिला पहिल्यांदाच दिवस गेलेले असतात. वाढणाऱ्या ओटी पोटाची तिला सारखी लाज वाटत असते. ती शौचाल जात असताना अचानक समोरून तिच्या नवऱ्याचा मालक येताना दिसतो आणि ती त्याच्या दृष्टीस पडू नये म्हणून रस्त्याच्या एका बाजूला जाते आणि मोरीत पाय जाऊन पडते. पाय मुडपतो. ती बेशुद्ध होऊन पाय झाडू लागते. तिला या अवस्थेत कुणातरी भूतानेच पछाडले आहे. असे समजून मालकाचे न ऐकता तपकिरे नावाच्या मांत्रिकाला बोलावण्यात येते. आजूबाजूचे यावर फक्त मांत्रिकच उपचार करू शकतो असे एकमुखाने सांगतात. तेव्हा मांत्रिक येतो भूत काढण्यासाठी पहिल्यांदा शिव बांधून देतो. त्याप्रमाणे एका बाजेवर तिला झोपविण्यात येते. मग भूत उतरविण्यासाठी साहित्य आणावयास सांगून जातो. त्याप्रमाणे साहित्य आणले जाते. भूत काढण्यासाठी केलेल्या कृतीचे शेळक्यानी तपशीलाने केलेले वर्णन अभ्यासण्यासारखे आहे. प्रथम तिच्या नवऱ्याला विहिरीवरून पाणी आणण्यास सांगून जागा सारवण्यात येते. बाजेवर दोघांनी घट्ट धरून शेवंतीला बसती करण्यात येते. प्रथम लिंबात चाकू खुपसून तिला भीती दाखविण्याचा प्रकार होतो. नंतर डोळयात मिरचीच्या बियांची भूकटी घालण्यात येते अर्थात डोळयात तिखट गेल्याने शेवंती किंचाळते, ओरडते धरलेल्यांच्या हातातून सुटण्याचा प्रयत्न करते. तपकिरे मांत्रिक मात्र "पोरीच्या अंगात भाईस्वं शिरल आये थे कोन कुठच हे इचारासाठी भजनी द्या लागते मजे लागट झाडाच्या तोंडातून समद सांगते

असे म्हणतो" उद्धव ज.शेळके यांच्या या कथामधून ते चित्रित करीत असलेल्या परिसरातील संस्कृतीचे, चालीरीतीचे प्रथांचे आणि लोकसमजाचे दर्शन घडते तसेच तेथील माणसाच्या वृतीप्रवृतीचे व त्यांचे तेथील समाज जीवनातील असलेल्या संबंधाचे अनुबंधाचे दर्शन घडते.

**"कढ" :-**

या कथेतील सरस्वतीचे दुःख अधिक तीव्र आहे. सांगायला लाज वाटावी, जीभ अडखळावी अशा प्रकारचे आहे. म्हणून ते लवकर व्यक्त रूप घेत नाही.| सरस्वतीचे लग्न झालेले आहे पण घरात पाय ठेवल्यापासून तिने आपल्या बुवाचे कोणतेच सुख पाहिलेले नाही. आणि जे सुख तिला मिळावयास हवे ते सुख आपली जावू घेत आहे असे तिला समजले आहे. ~~सेवंतीचे~~ सरस्वतीचे हे दुःख कथेच्या अखेरीपर्यंत व्यक्त रूप घेत नाही. पण देवकीच्या मायाळू स्पर्शात तिचे दुःख भडभडून येते आणि पूर आल्यानंतर आसमंत व्यापून टाकावा तसे कथेला व्यापून टाकते. शेळक्यांच्या इतर कथातून पात्रांच्या हालचालीतून क्रिया प्रतिक्रियातून दुःख ठिपकत राहते कथेच्या अखेरीपर्यंत सारखे ठिपकत राहते.. पण या कथेत कथेच्या अखेरीला ते प्रकट रूप घेते व मग संपूर्ण कथेला व्यापून टाकते.

**पुरूषांच्या असहायतेचे चित्रण करणाऱ्या कथा :-**

उद्धव ज.शेळके यांच्या कथामधून स्त्रियांच्या अनेक पदरी दुःखाचा वेध घेतलेला आपणास पहावयास मिळतो. त्याचप्रमाणे त्यांच्या कथामधले पुरूषही अडचणीत सापडतात. बऱ्याचदा कुटुंबाचा कर्ता या नात्याने त्याला आपले दुःख बोलून दाखविता येत नाही. हे जसे खरे आहे. त्याप्रमाणे त्याला आपली जबाबदारीही टाळता येत नाही. सामाजिक परंपरा, रूढी, ग्रामरहाटी यामुळे त्यालाही अगतिक करील अशी परिस्थिती निर्माण होते. जात्याच पुरूष असल्याने त्याला रडूनही आपले दुःख व्यक्त करता येत नाही. "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील पुरूषांच्या असाहयतेचे चित्रण करणाऱ्या कथा प्रामुख्याने "दुःख", "पौरूष" या सारख्या कथा अभ्यसनीय आहेत.

✓ **"दुःख" :-**

या कथेत वेगळाच आशय आपणास पहावयास मिळतो. हॉटेलात कपबश्या विसळण्याचा आणि त्याला स्वतःला शरमेचा वाटणारा धंदा करणाऱ्या रामाला पोलीसाची नोकरी मिळाली आहे. ऑर्डर त्याच्या हातात पडली आहे आणि त्यामुळे त्याला आकाश ठेंगणे वाटत आहे. लोकांना आपण गोष्ट सांगावी व त्यानी आपले कौतुक करावे असे सारखे त्याला वाटत आहे. पण एवढी आनंदाची बातमी सांगूनही कोणी त्याचे कौतुक करीत नाही आणि हेच रामाचे दुःख आहे.

✓ **"पौरूष" :-**

उद्धव ज.शेळके यांच्या "पौरूष" या कथेतील मारोतीचे व्यक्तिचित्र मात्र आगळेवेगळेच आहे. साहेबांच्या घरी साहेब व साहेबाची बायको नांदायला येत नाही. तो आणायला जातो. तेव्हा त्याने लग्नाआधी जास्त पगाराची व ऑफिसातली नोकरी असल्याचे सांगितल्याची आठवण देवून मेव्हणा व सासरा अपमान करतात. व त्याच्या बायकोला त्याच्याबरोबर पाठवीत नाहीत. आता नुसतेच परत गेलो तर शेजारी पाजारी व मित्रमंडळी चौकशी करू हसतील म्हणून तो तिने सासरवाडीत शिऱ्यात विष कालवले म्हणून अशी बायको न आणण्याचा आपणच निर्णय घेतल्याचे सांगतो.

"पौरूष" या कथेतील मारोती बायकोला आणायला जाण्यासाठी मित्राचा कोट मागून घेतो लग्नातही त्याने हा कोट घातलेला असतो. लग्नापूर्वी आपल्याला चांगली नोकरी असल्याचे खोटेच सांगितलेले असते त्याप्रमाणेच बायको नांदायला येत नाही म्हंटल्यावर तिने विषप्रयोग केल्याचेही त्याने खोटेच सांगितलेले असते. यावरून तो खोटारडा आहे हे लक्षात येतेच पण त्या खोटारडापणामागे आपली दयनीय अवस्था कसेही करून लपविण्याची धडपड करणारे एक व्यथित मनही चित्रित होते. दरिद्री माणसाच्या मनातील हया प्रकारचे ताणतणाव आणि आंदोलने चित्रित करताना उद्धव ज.शेळके छोटया मोठया प्रसंगाची अशी काही सुंदर

गुंफण करतात की, ही माणसे जीवनात कुठलेही सुख नसताना स्वतः जगतात कशी आणि स्वतः जगता जगता इतरांची काळजी वाहत त्याना सांभाळतात तरी कशी याचा प्रश्न पडावा मानवी मनाचे सूक्ष्म पदर अभिव्यक्त करण्यात उद्धव ज. शेळके यांचे सामर्थ्य व्यक्त होते यात शंका नाही.

एकूणच कथेच्या आशय सूत्रांचा विचार केला असता बाहयसृष्टीतील वर्णनाद्वारे ते पात्रांच्या मनातील मानसिक आंदोलनाचे चित्रिकरण करतात. कथा सृष्टीच्या आशयाचे बीज विदर्भातील रसातळातला विशेषतः खेडयातला माणूस आहे. सर्वसामान्य लोकांचे जीवन परंपरा, अंधश्रद्धा, दारिद्रय यावर प्रकाश टाकतात. शेळके यांच्या कथेत कुठल्याही प्रकारचा पाल्हाळिकपणा दिसून येत नाही. तर त्यांच्या कथेत सुटसुटीतपणा दिसतो. "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील आशय सूत्रांचा अभ्यास आपण पाहिला. या कथासंग्रहातील सामाजिक चित्रणाचा आपणास विचार करावयाचा आहे.

**"शिळान अधिक आठ कथा" मधील सामाजिक चित्रण :-**

भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान संस्कृती आहे. आर्थिक दृष्टया स्वावलंबी असलेली नागर स्त्री देखील या पुरूषप्रधान संस्कृतीत खऱ्या अर्थाने युक्त नाही. अशा परिस्थितीत ज्या ग्रामीण स्त्रीच्या दुरान्वये देखील आर्थिक बाबीशी संबंध येत नाही. ती स्त्री मुक्त असेल ही कल्पनाच संभवत नाही. शेतकरी स्त्रीला तिच्या संपूर्ण आयुष्यात पैशाचे साधे दर्शन देखील घडणे मुश्कील होते शेतमजूर स्त्रीचा शेतमालकाकडून मजूरी घेण्यापूरता पैशाशी संबंध येतो हे खरे पण घरी आल्यानंतर मजूरीची जी काही रक्कम असेल ती तिला आपल्या कारभाऱ्याच्या हाती स्वाधीन करावी लागते.

भारतीय ग्रामीण स्त्री कमालीची परावलंबी आहे. हेच यावरून स्पष्ट होते. भारतीय स्त्री आर्थिक दृष्टया पूर्णपणे परावलंबी आहे. केवळ परावलंबी आहे असे नाही तर ती अज्ञानाने व दारिद्रयाने गांजलेली आहे. हे अज्ञान जसे पारंपारिक स्वरूपाचे आहे.

त्याचप्रमाणे अशिक्षितपणापोटी आलेले आहे. नागरी व ग्रामीण स्त्रीचे स्त्री म्हणून असलेले दुःख समान असले तरी काही प्रमाणात वेगळे आहे. ते केवळ याच कारणामुळे म्हणावे लागेल. या कथासंग्रहातील प्रत्येक कथा स्त्री दुःख घेऊनच येते.

"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील स्त्रीजीवन, त्यांच्या व्यथा, वेदना, समस्या इत्यादींचा आढावा वरीलप्रमाणे सांगता येईल. उद्धव ज.शेळके यांच्या कथेतील या व्यक्तीना स्वतःच्या मर्यादाचे भान आहे. हे भानच त्याना जीवनातील व्यथा, वेदना सोसायला सामर्थ्य देते. सर्वसामान्य ग्रामीण स्त्री सोशिक असते. तशी उद्धव ज.शेळके यांच्या कथेतील स्त्री आहे. ती समाधान मानणारी नवऱ्याला सहयोग देणारी तो कसाही असला तरी त्याच्याबद्दल फारशी तक्रार न करणारी आहे. पण त्याने आपल्याला सुख द्यावे. अशीच ती मनोमन इच्छा प्रकट करताना दिसते.

उद्धव ज.शेळके यानी आपले बरेचसे कथालेखन ग्रामीण परिसर केंद्रस्थान मानूनच केलेले आहे. ग्रामीण जीवन केंद्रबिंदू मानून प्रस्तूत कथासंग्रहाचे लेखन त्यानी केले आहे. या संग्रहातील समाजचित्रणाचा विचार करीत असताना प्रामुख्याने स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या खेडयात काय सुधारणा झाल्या. तेथील जीवन कसे जगले जाते. हेच पाहणे इथे उदबोधक ठरेल.

"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील जवळ जवळ सर्व कथा समाजातील खालच्या थराचे चित्रण करणाऱ्या आहेत. उद्धव ज.शेळक्यांच्या कथामधून संघर्षमय जीवन मोठयाप्रमाणात दिसते. "माय", "अगतिकता", "लेकुरवाळी" या सारख्या कथातून स्त्रीची दुःखे त्यासाठी त्यांना करावा लागणारा संघर्ष दिसून येतो. "माय" ही कथा शेळकेनी अतिशय घरगुती साध्या भाषेत लिहिली आहे. एक गरीब झुंजणारी फाटक्या कपडयातील "माय" त्यानी उभी केली. "माय" या कथेतील माय काम न करता बसून खाणाऱ्या "बा"शी कधी सरळ बोलत नाही. पण स्वतः जीवापाड कष्ट करून पोराबाळासह ती "बा" लाही

सांभाळते. कामावर जाताना एका भाकरीचे चार तुकडे ठेवते तीन तुकडे मुलांनं आणि चवथा "बा" साठी असतो. घरासाठी खस्ता खाणारी ही "माय" कथा वाचून झाल्यावरही वाचकाच्या डोळ्यापुढे तरंगत राहते एवढी ती मनावर ठसते. "माय" कथेतील "माय" माणदेशी माणसे मधील व्यक्तिरेखा सारखी उठून दिसते हे शेळक्यांच्या कथेचे विशेष नोंदवणे आवश्यक वाटते.

"अगतिकता" या कथेतील असहय अगतिक माणसे प्रसंगी आत्मसमर्पणालाही तयार होतात. "बा" मेल्यानंतर छेड काढणा-या येशालाच रंगी शरण जाते. अशा प्रकारचा आशय अगतिकता या कथेत उद्धव ज. शेळके रेखाटताना दिसतात.

"लेकुरवाळी" या कथेत शेवंताला बाळांतरोग झाला आहे. या बाळांत रोगात आपल्याला काहीतरी बेरेवाईट होणार आहे. आपण निश्चित या जगातून जाणार आहोत हे तिला कळून चुकलेले आहे. म्हणून तिला दुःख वाटत नाही. तर आपल्या माघारी आपल्या चिल्ल्या-पिल्यांचे कसे होणार हीच तिला काळजी लागलेली आहे. आणि त्या काळजीच्या पोटी तिचे दुःख निर्माण झाले आहे असे "लेकुरवाळी" या कथेतून आशय प्रगट होतो.

"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील कथा संघर्षमय दुःख, व्यथा, वेदना विशेष करून पुरूषापेक्षा स्त्रियांच्या वाटयाला मोठया प्रमाणात आलेला दिसून येतो. माणूस म्हटल की संघर्ष आला. हा संघर्ष कधी स्वतःशी, कधी समाजाशी, कधी नियतीशी, तर कधी स्वतःच्या जगण्याशी अटळ असणारा हा संघर्ष मानवी जीवनातील एक अपरिहार्य भाग बनून जातो. वारंवार पडणारे दुष्काळ, बेरोजगारी, वाढती महागाई, रोगराई अंधश्रद्धा इ. अनेक गोष्टीमुळे सामान्य माणसाला दैनंदिन जीवनात पोटाशीच संघर्ष करावा लागतो.

विदर्भाच्या समाज जीवनातील आशयाची अभिव्यक्ति करीत असताना वापरलेली भाषा, वातावरण निर्मिती, जीवनदर्शनाची व्यापकता या गोष्टीमुळे त्यांच्या कथा वैशिष्टयपूर्ण

13380
A.

ठरल्या आहेत. हे समाजजीवन प्रामुख्याने ग्रामीण विशेषतः विदर्भाच्या प्रदेशाचे चित्रण करणारा आहे. अनेक विध परिमाणे असलेल्या कथामधून व्यक्ती-समाज, निसर्ग-नियती हा संघर्ष केंद्रस्थानी आहे त्यामुळे प्रत्येक कथेचे स्वरूप थोडे व्यापकच आहे. प्रमुख संघर्ष आहे तो जगण्याचा, त्यामुळे जीवनात निर्माण होणारी दुःखे ही माणसे आनंदात झेलत राहतात. त्यांना सामोरी जातात. प्रसंगी जीवनाची बार्जी लावतात.

अशारीतीने "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील सामाजिक जीवन चित्रित झालेले दिसून येते.

**"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहाची प्रमुख वैशिष्ट्ये :-**

उद्धव ज.शेळके यांच्या कथालेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल. त्यांनी निरनिराळया विषयांची केलेली मार्मिक मांडणी तसेच आटोपशीरपणे भावस्पर्शी व्यक्तिमत्वाची निर्मिती, त्याचप्रमाणे निवेदनातील गतिशीलता, व-हाडी बोलीच्या खास ढंगदार शैलीतील लेखन, कलात्मक-रित्या कथेचा आशय व्यक्त करण्याचे कौशल्य इ.उद्धव ज.शेळके यांच्या कथालेखनाची प्रमुख ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. शेळके यांच्या कथेतून विशेषत्वाने ग्रामीण स्त्रीचे दुःख वास्तव पातळीवरून रेखाटले आहे. तसेच ग्रामीण श्रमजीवी माणसाच्या व्यथा ते चित्रित करतात.

उद्धव ज.शेळके यांचा "शिळान अधिक आठ कथा" हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९५८ साली प्रकाशित झाला. ज्या काळात त्यांनी हया ग्रामीण कथा लिहिल्या. त्या काळातील अत्यंत जोमदारपणे व सातत्याने तसेच वैफुल्याने विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे ते एकमेव कथाकार आहेत. त्यांच्या कथामधून ग्रामीण जीवनातील सर्व स्तरांचे दर्शन घडते. ही कथा जशी खेडयात, ग्रामीण परिसरात घडते तशीच खेडयातून मोलमजूरी नोकरीसाठी शहरात आलेल्या माणसाच्या जाणिवा व्यक्त करते. ग्रामीण ही संज्ञा केवळ परिसरावर भौगोलिकतेवर अवलंबून नाही. तर संबंध जीवनपद्धती, आचार विचार आणि भाववृती संस्कृतीवर

ती अवलंबून आहे. याचा प्रत्यय त्यांच्या कथा वाचून येतो. गावगाडा आणि गावगाडयाशी बद्ध असे ग्रामांतर्गत जीवन यांची उद्धव ज.शेळक्यानां चांगली जाण आहे.

उद्धव ज.शेळके यांच्या कथामधून परिसरातील संस्कृतीचे, चालीरीतीचे, प्रथांचे आणि लोकसमजाचे दर्शन जसे घडते. तसेच तेथील समाज जीवनातील असलेल्या संबंधाचे, अनुबंधाचे दर्शन घडते. शेळके यांच्या कथामधून गोचर होणारा परिसर हा विदर्भाचा विशेषत्वाने अमरावतीच्या परिसराचा आहे. एरवी समृद्ध असलेल्या व-हाडातील खुरटलेल्या माणसाचे चित्रण त्यांच्या कथेतून येते. त्याच प्रमाणे प्रत्यक्ष कृषीजीवनाचे चित्रण ते अपवादानेच करीत असल्याने गाव, गावालगतची तुरळक स्वरूपाची वर्णने शेळके यांच्या कथेतून येतात. या वर्णनातून त्या परिसरातील ग्रामीण माणसाची घरे, राहणी यांचे चित्र उभे राहते.

उद्धव ज. शेळके यांच्या कथेतील व्यक्ती प्रामुख्याने गरीबीशी, नियतीशी झुंज घेत असलेल्या दिसतात. ही झुंज घेत असताना ती कावलेली, त्रासलेली असतात, उबगलेली असतात परंतु याही परिस्थितीत अंतर्यामी ती परस्पराविषयी माया बाळगून असतात. शेळक्यांच्या कथेतील या व्यक्तीना स्वतःच्या मर्यादेचे भान आहे. हे भानच त्याना जीवनातील व्यथा वेदना सोसायला सामर्थ्य देते. सर्वसामान्यपणे ग्रामीण स्त्री सोशिक असते. तशी शेळक्यांच्या कथेतील स्त्री सोशिकच असते. तशी शेळक्यांच्या कथेतील स्त्री सोशिकच आहे. परंतु शंकर पाटलांच्या कथेतून व्यक्त झालेली बहुतेक स्त्री ही कर्ती स्त्री आहे. तशी कर्ती स्त्री शेळक्यांच्या कथेत नाही असे नाही त्यांच्या 'माय' या कथेत तशी स्त्री अवतरली आहे. पण उद्धव ज. शेळके यांच्या कथेतील स्त्री अधिक वास्तवपूर्ण आणि ग्रामीण जीवनाशी अधिकार संबंद्ध अशी चित्रित होत असल्याने ती समाधान मानणारी आहे.

या कथासंग्रहाचे आणखी एक वैशिष्टये नमूद करावे वाटते ते म्हणजे

त्यांच्या कथेतून निसर्ग क्वचितच आवतरतो आणि जेव्हा तो आवतरतो तेव्हा विदर्भातील विषम हवामान प्रत्ययास येते. तिथे उन्हाळा कसा कडक असतो याचे हे "अगतिक" कथेतील चित्र "उन्हाचा लाव्हा सर्वत्र वखवखत होता. सृष्टी तापून निघाली होती. गवताची खुरटं तर कधीचीच करपली होती. जिकडे तिकडे फुफाटा झाला होता तो अंग धरून बसला होता कधी कुणाचा पाय येतो आणि आपण त्यास भस्म करतो असच जणू त्या फुफाटयाला वाटत होत." त्यांच्या कथेत परिसराला पोषक असा निसर्ग फारसा नाही तरीही जेव्हा निसर्ग येतो, तेव्हा मानवी स्वभावधर्माशी, प्रसंगाशी एकरूप होऊन येतो.

दरिद्री माणसाच्या मनातील ह्या प्रकारचे ताणतणाव आणि आंदोलने चित्रित करताना शेळके छोटया मोठया प्रसंगाची अशी काही सुंदर गुंफण करतात की, ही माणसे जीवनात कुठलेही सुख नसताना स्वतः जगतात कशी स्वतः जगता जगता इतरांची काळजी वाहत त्याना सांभाळतात तरी कशी याचा प्रश्न पडावा मानवी मनाचे सूक्ष पदर अभिव्यक्त करण्यात शेळकेंचे सामर्थ्य आहे.

उद्धव ज.शेळके यांच्या प्रत्येक कथेतून जी व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्यांच्या बाहयांगावर भर देण्यापेक्षा त्या व्यक्तींच्या अंतर्मनाचे दर्शन घडविण्यात, त्या मनाचे विविध पदर शोधण्यात अधिक रस आहे. असे दिसते जीवनाकडे ज्या गांभीर्याने त्यांच्या कथेतील व्यक्ती पाहतात त्या दृष्टीकोणातूनच त्यांचे सोशिकपणे दुःख भोगणेही तेवढेच गंभीर आहे. अर्थात ज्या सामर्थ्याने शेळके हे सर्व रंगवतात ते त्यांच्या लेखणीचे सामर्थ्यही लक्षणीय आहे. असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.

**"शिळान अधिक आठ कथा" मधील भाषा :-**

उद्धव ज. शेळके यांच्या कथेचा गौरवपूर्ण उल्लेख करताना समीक्षकांनी म्हटले आहे. "शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्राहाबरोबर प्रादेशिक वाङ्.मयात आणखी एक नवे पान लिहिले गेले. व-हाडी बोली व व-हाड्यातले संकेत हे या कथाद्वारा पुढे आले.

"शिळान अधिक आठ कथा" या कथासंग्रहातील दिवाळी या कथेतील शेषा आणि जानकी यांचा संवाद पाहिल्यानंतर वैदर्भीय बोली भाषेची वैशिष्ट्ये आपणास जाणवल्याशिवाय राहत नाहीत.

"आन बजार आनले पालू मालू कितीक नेले।"

"एक थैली आन धोतरचा पालू"

"बस ? तिनं भीत भीत विचारल",

"काई बासन मासन नाई नेल का तुपासाठी?"

"नेलाना जल्मनचा लायना गडू "

"लायनाच?" जानकी म्हणाली

"आन खालच्या तेलाले, काई?"

"नेली त्या मंद्यानी धून ठूली होती थे सिसाई नेली"

आणि ती अंधार चाफलू लागली. सराईत हातानी निश्चित जागची चिमणी हुडकून काढली. चिमणी घेऊन सायवानातल्या कोवळया अंधारात आली. बोटाच्या चिमटीत चिमणीची नकटी वात नोचू लागली. अंगार डब्बी वाजली व त्याच क्षणी कोवळा अंधार नाहीसा झाला. तिथला उजेड पाहून शेषा एकदम म्हणाला

"मा आता इथिसा दिवेतन नाई लावत काई?

"का बा अंधारात आये का तू आता?"

"तस नाई मनताओ।" आपल्याला नक्की काय म्हणायच आहे हे लक्षात घेऊन शेषा चटकन म्हणाला "विडीच्या तेलाचे नाई, खाच्या तेलाचें।"

"गेले काय थे बुवा बाजारात?"

"हो"

येथे उद्धव ज.शेळके निवेदन आणि संवाद यात भाषिक फरक तर जाणवतोच पण निवेदकाचे वेगळेपणही जाणवते. असे का होते? तर ही बोली आपल्या वाचकांना अपरिचीत असावी व तिचा अडसर होऊ नये म्हणूनच येथील निवेदक नागर भाषेत निवेदन

करीत आहे. संवादातील परिणामकारकता कमी होऊ नये म्हणून ते व-हाडी बोलीतून साकारतात. या संदर्भात आनंद यादव यानी व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेच्या अनुषंगाने जे म्हटले आहे. तेच शेळके यांच्या कथेत भाषेला लागू पडते.

उद्धव ज. शेळकेंच्या समोर प्रादेशिकताही असावी. निखळ व-हाडी बोली जाणणारा मर्यादित वाचक वर्ग त्यांनी विचारात घेतला असावा असे दिसते. बोलीसाठी प्रमाण भाषेच्या व्याकरणाचे नियम वापरून चालणार नाही. एरवी प्रमाण भाषेत मला, तुला, त्याला अशा अकारान्त शब्दांची व-हाडी मध्ये माला, तुले, त्याला अशी आकारांत रूपे असलेली दिसतात. किंवा ठेव, पहा, आण अशा क्रियापदाची रूपे ठेवजो, पायजो, आनजो अशी आढळतात या पद्धतीनेच जा, ये, रहा या ऐवजी जायन, यान, राहन अशी रूपे वापरतात.

काही शब्दातून उच्चाराचे लघुत्व जाणवते उदा. मन्ली, आन्त, मनू, जाच, धुवाच, पहाच इ. तसेच काहीचे उच्चारही बदललेली असतात. उदा.ती ऐवजी थी, नको ऐवजी नोका, हो ऐवजी है इ.

सर्वसाधारण 'ळ' चे 'य' हया व्यंजनात रूपांतर होते उदा.दिवाळीचे - दिवाई, मिसळ गिसळचे - मिसय गिसय चाले - चाये, भोगंळी - भोंगई असे होते

व-हाडी बोलीचे हे सगळे विशेष शेळके यांच्या कथेत प्रकट होतात. तसेच शेळकेंच्या कथेतून येणारे बोलीतील अस्सल शब्दही बोलीचे वेगळेपण सिद्ध करतात. उदा.बोथरी, लायना, मांदकी, भसके, होतकाड, सोकारी, धगडे, गबरू डबच्या वानाच, औलाद, मायजनक्या, बोकडया इ.

उद्धव ज.शेळके याना ग्रामीण वास्तवाचे चांगले आकलन आहे. म्हणून

ही ग्रामीण माणसे ज्या पद्धतीने अविर्भाव करून बोलतात त्यांच्या बोलण्यात उच्चारांच्या ज्या विशिष्ट लकबी येतात त्या त्यानी टिपल्या आहेतच पण संवादाची परिणामकारकता जाणवण्यासाठी त्या त्या उच्चारणातील लकबी व भाववृती याना जे शब्दरूप देतात.

उद्धव ज. शेळके यांच्या कथेतून येणारे वाक्यप्रयोग आणि म्हणीही अभ्यासण्यासारख्या आहेत. उदा. जोगडयावानी पसरणे, इकडची कवडी तिकडे करणे, मायबयनी जूव्यात मांडणे, देड दमडीची रंडी असणे, आग हुरडाची गरज असणे, अंगावर कयासाच पाणी पडणे, गोरापानी संगच असणे, उठला जोगी बसला परोळी अन हात फिरवते (घालमेल) घरात खूपवर बघत असलेल्या तांबडया तिखटासाखा उग्र डोळयाखालच राकट बेमुर्वतपणे म्हणाल (कढ) उन्हाचा लाव्हा सर्वत्र वखवखत होता.(अगतिकता)

शेळके यांच्या कथेतून येणारी भाषा प्रत्ययकारी बोलतील संवाद, साद शब्दांचा वापर, शब्दाच्या वाक्यांच्या उच्चारण्यातील लकबी शब्दात पकडण्याचा त्यांचा प्रयत्न वाक्यप्रयोग व म्हणी या सर्वांचा विचार केला असता भाषा आणि शैली यांच्या विकासाच्या ज्या टप्प्यावर ते आहेत त्यापेक्षा पुढे त्याना झेप घेता आली असती असे जाणवते.

शेळके यांच्या 'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहातील बहुतेक सर्व कथामध्ये एका विशिष्ट परिसरातील वेगवेगळी दृष्ये चित्रिली आहेत. दारिद्र्य हे या परिसरातील जीवनाचे प्रमुख लक्षण आहे. दैनिक कमाईवर, तीही बदलती अनिश्चित त्या त्या दिवसाचा चरितार्थ अवलंबून असल्याने येथील माणसाना स्थैर्याचा, निश्चिततेचा, नियमिततेचा, सुरक्षिततेचा अनुभव नाही दोनवेळा पुरेसे अन्न कसे मिळेल या विचारात व उद्योगात दिवस संपत असल्याने माणसाच्या मुलभूत गरजा खेरीज अन्य गरजांची दखल घेणेही त्यांच्या आयुष्यातील चैन ठरते. परिणामी अन्य भावना, मनोविकार थंड झाले, लुप्त झाले असे नाही. घट्ट ओठ मिटून ते रिचवावे लागले आहेत. तान्हया मूलाला

टाकून आई तासनतास बाहेर राहते मुले अर्धपोटी असतानाच पीठ संपते. तेंव्हा पाणी प्या व झोपा असे संथसुरात आई सांगते. मुले लाचारी पत्करतात लबाडी करतात स्वार्थी बुद्धी जोडतात ही लाचारी आहे. लबाडी आहे हे उमगत असते पण ती मनाला जाच करीत नाहीत. कारण शरीराचा जाच अधिक तीव्र असतो. चोरी, लबाडी, स्वार्थ, साधूपणा या गोष्टी इथले लहान-थोर अगदी प्रांजळपणे जणू निर्मळ मनाने करतात गुन्हे म्हणून ते काही करीत नाहीत. हा एक जातीचा निबरपणा, विकारांना आलेला बोथटपणा या माणसाच्या स्वभावातील प्रमुख लक्षण आहे. जिवंत राहता येणे या एकाच संदर्भात सर्व गोष्टीचे मोल ठरते. परिस्थितीचा हा न्याय बव्हंश लोकानी मुकाटयानी पत्करला आहे. ब-याच पुरूषानी जवळ जवळ सर्वच स्त्रियानी गरजेनुसार या स्त्रिया देहमनाने अधिक राकट झाल्या आहेत ब-याचवेळा पुरूषाचे कर्तव्य पत्करल्याने असेल त्या अधिक पुरूषी झाल्या आहेत.

येथील पुरूष ब-याचदा विषण्ण वैफल्यग्रस्त दिसतात. आपल्या असहयतेमुळे असेल ते उद्विग्न होतात. सगळयापासून पराड्.मूख होतात. जुवा, नशापाणी यात ते स्वतःला विसरू पाहतात. फिकीर सोडून देतात अधिकाधिक बेजबाबदारपणे बनत जातात.. पळून जाऊ पाहतात परिस्थितीशी झुंज देणा-या त्यांच्या स्त्रियाना हे ही दुःख पत्करावे लागते. तरीही त्या धडपडत राहतात. चिवटपणे, अधिक तिखटपणे तरीही पोटात माया ठेवून जातात. हिंदू स्त्रीची कर्तव्यदक्षता निमुटपणा टिकवीत.

येथील जीवनाचा, माणसाचा रंग उद्धव ज. शेळके यांनी फार पक्का जाणला आहे आणि आपल्या कथामध्ये बारकाव्यानिशी त्यांचे चित्रण केले आहे. बोलीतील त्या परिसरातील बारकावे त्यांच्या लेखनात अचूकपणे अवतरतात एवढेच नाही. त्याना एकात्मतेने सजीव करणारे सत्य त्यांच्या कथेत आहे ही केवळ हौसेपोटी प्रादेशिक झालेली नाही. त्यांच्या काही कथेतून एका संपूर्ण दिवसातील घटनांचा क्रम सांगावा ही पद्धत आढळते.

अशारितीने 'शिळान अधिक आठ कथा' या कथा संग्रहातील दारिद्रियामुळे

होणारा भावनिक कोंडमारा, स्त्रीची होणारी कुचंबणा, पुरूषांच्या असहायतेचे चित्रण करणा-या कथा, सामाजिक चित्रण, कथासंग्रहाची वैशिष्टये, कथासंग्रहाची भाषा इ. अंगानी मांडणी केली आहे.

**समारोप :-**

प्रस्तुत प्रकरणात 'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहाच्या सर्वांगीण विचार करत असताना आशयसूत्रे, समाजचित्रण, स्त्रीजीवन आणि भाषाशैली या अंगानी केला आहे. त्यांच्या कथेतील पात्रे दुःख भोगण्यासाठी जन्माला येतात. त्यामुळे दुःख एक जीवनाचाच भाग आहे असे समजून ती जगत राहतात. साहजिकच त्याना कसलीच खंत नसते. प्रत्येक कथा एखादया वर्णनाने प्रसंगाची सुरूवात करते आणि दुःखाची खरी सुरूवात कथा संपल्यावरच सुरू होते हे त्यांच्या कथेचे जाणवलेले वैशिष्टय आहे.

उद्धव ज. शेळके यांच्या कथेची वैशिष्टये तिच्या रंगरूपातील विविधता जाणून घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे. त्यांच्या कथांची शीर्षकेसुद्धा परिणामकारकच आहेत प्रत्येक शीर्षकामधून ध्वनित अर्थ दिसून येतो. इथेही त्यांच्या शैलीचाच एक गुण मानावा लागतो.

विदर्भातील जनजीवन, दारिद्र्य, आर्थिक विषमता, पिळवणूक व या सा-यावर प्रभूत्व गाजवणारी नियती यांच्यातील असलेले परस्पर गुंतागुंतीचे संबंध अधिक बारकाव्यानिशी व्यक्त होतात. त्यामुळे त्यांच्या कथा अधिक परिणामकारक आणि उठावदार झाल्या आहेत.

सारांश उद्धव ज. शेळके यांची कथा मराठी साहित्याला एक वेगळे अनुभवविश्व आणि अभिव्यक्ती देवून जाते त्यामुळे त्यांच्या 'शिळान अधिक आठ कथा' हा एक उत्कृष्ट प्रादेशिक कथासंग्रह आहे. असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

-o-o-o-o-